राज्यातील खाजगी अंशत: व पुर्णत: अनुदानित, स्थानिक स्वराज्य संस्थेतील व अध्यापक विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे माहे फेब्रुवारी, २०१८ ते एप्रिल, २०१८ पर्यंतचे वेतन ऑफलाईन पध्दतीने वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : वेतन १२१८/प्र.क्र.२८/१८/टीएनटी-३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २३ फेब्रुवारी, २०१८

वाचा :- शासनाचा समक्रमांकीत दिनांक २ फेब्रुवारी, २०१८ रोजीचा शासन निर्णय

प्रस्तावना :-

शालार्थ प्रणालीच्या डाटा बेस सॉफ्टवेअरमध्ये दिनांक १२.०१.२०१८ पासून तांत्रिक दोष निर्माण झाला असल्याने ही प्रणाली लवकर सुरु करणे शक्य नाही. त्यामुळे शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे माहे जानेवारी, २०१८ चे वेतन ऑफलाईन पध्दतीने अदा करण्यास दिनांक २.२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांना फेब्रुवारी, २०१८ ते एप्रिल, २०१८ या कालावधीचे वेतन देखील ऑफलाईन पध्दतीने अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्यातील खाजगी अंशत: व पुर्णत: अनुदानित, स्थानिक स्वराज्य संस्थेतील व अध्यापक विद्यालयातील शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांपैकी माहे जानेवारी, २०१८ मध्ये ज्या शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्याचे वेतन ऑफलाईन पध्दतीने अदा करण्यात आले आहे, त्या कर्मचाऱ्यांना शासन निर्णय दिनांक २.२.२०१८ मध्ये नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून लगतपूर्व (म्हणजे फेब्रुवारी, २०१८ च्या वेतनासाठी जानेवारी, २०१८) महिन्याच्या वेतन देयकाच्या आधारे फेब्रुवारी २०१८ ते एप्रिल २०१८ या महिन्यांचे ऑफलाईन वेतन अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २१९/व्यय-५, दिनांक १७.२.२०१८ व अनौपचारिक संदर्भ क्र. १४/कोषा प्रशा -४, दिनांक २२.२.२०१८ च्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२२३१७४७१४३२२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Charushila D Chaudhari

Digitally signed by Charushila D Chaudhari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=b99d7dca0e63be1bd1b7158b9523537dcc1d46bc807768647a9ed4ff3816ecf3, cn=Charushila D Chaudhari
Date: 2018.02.23 18:32:55 +05'30'

(चारुशीला चौधरी)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल मुंबई
२) मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
३) प्रधान सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४) महालेखापाल, (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई, नागपूर
५) महालेखापाल, (लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई, नागपूर
६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी
७) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
८) शिक्षण संचालक (प्राथमिक) , महाराष्ट्र राज्य, पुणे
९) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१०) संचालक, विद्यापरिषद, पुणे
११) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
१२) सर्व शिक्षणाधिकारी / शिक्षण निरीक्षक (माध्यमिक / प्राथमिक)
१३) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१४) सर्व अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक/माध्यमिक)
१५) वित्त विभाग (व्यय-५ / कोषा प्रशा-४), मंत्रालय, मुंबई
१६) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, अर्थसंकल्प कार्यासन / संगणक शाखा, मंत्रालय, मुंबई
१७) निवड नस्ती-टिएनटी-३.